दस्त नोंदणी न केलेल्या प्रकरणांमध्ये,ई- पेमेट पध्दतीने भरलेल्या नोंदणी फी चा परतावा

Refund of Registration fee paid by e-payment in case of Non Registration of document

## विषय ओळख (About)

दस्तावरील रुपये 300/- वरील नोंदणी फी ही ई-पेमेट पध्दतीने शासनास जमा करणेची पध्दत अंमलात आहे. नोंदणी फी ही कधी भरण्यात यावी, याबाबत विशिष्ट अशी तरतुद नाही, फक्त दस्त नोंदणीस सादर करतांना, फी भरल्याची पावती दस्तास जोडावी लागते.

परंतु दस्त नोंदणी केलेली नाही किंवा करावयाची नसल्यास, संबधित नोदंणी फी भरणारे पक्षकार ज्या दुय्यम निबंधक कार्यालयाचे नावाने अशी नोदंणी फी शासनास भरलेली आहे, त्या दुय्यम निबंधकास परतावा मिळणेकरात अर्ज करु शकतात. दुय्यम निबंधक उचीत ती खातरजमा करुन परतावा मंजुर करणेसाठी तसा प्रस्ताव, सह जिल्हा निबंधक कार्यालयात पाठवितात.

असा नोंदणी फी चा परतावा मंजुर करण्याचे अधिकार हे सह जिल्हा निबंधक यांना आहेत. ते यथोचीत ती खातरजमा करुन अशा रकमेचा परतावा मंजुर करण्याचे आदेश पारीत करतात. यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी ‹दस्त नोंदणी‹ इतर काही महत्वाच्या बाबी ‹नोदंणी फी परतावा पहावे.